There was no sign of rains slowing down and the strong wind calming down. The rains were making a "Tip-Tip" sound at the puddles of water gathering at the potholes at the lane. However I was calm and quiet as I had already informed on the cell phone of my whereabouts to the family members adding that there was no cause for worry.

Initially I had thought the rains would stop within half an hour or so. However the rains and the winds grew in intensity. There was occasional lightning and thunder. So sharp was the lightning that everyone inside the "Sabhamandap" shivered for a while. There was a cracking sound outside and I could see a few branches of the tall trees beyond the lane had come down heavily, one or two branches falling on the rooftop of a car nearby and the roof of a "Tapri". The fragile door of the "Tapri" fell down on the ground. I really felt very sorry because the person who runs a "Tapri" is generally from a poor class.

I realized that it was a storm though not of high intensity. The wind continued to blow in a menacing way. I just could not understand what was happening and why this wrath of nature. It was difficult to understand why the mother nature seemed cruel and unkind at times. Was this a way of showing displeasure to city dwellers because they never paid any heed to the warning signals from the nature.

Somewhat in a pensive mood I was looking quietly once outside and the next moment at the idols. I dozed for a little while. When awake I could see that the rain had completely stopped but for little drizzle and the wind was now very quiet. It was just a cool breeze. I got up from my seat and went near the idols in the "Garbhagruha" and bowed with all humility and reverence to the idols of Ram, Laxman and Sita.

Feeling happy that all was quiet now, I started walking towards my place. There was a total transfer scene now. The fury of the nature was over and now it was all calm, soothing and pleasant. The cool breeze impregnated with rain, the raindrops coming down gently from the tree leaves on the passerbys and the rain water running down from the puddles carrying with them some garbage. It was now the loving and kind mother nature now. Suddenly I realized that mother nature occasionally teaches a lesson to the errant humans. Once that is over, without harboring any grudge or wrath the nature unfolds all love and care in an abundant way. What about me and other people. Storms are there, often shortlived, though in ones life. The causal pressure of the storm is due to the opposite view or unwelcome inclinations shown by those near and dear to us. In particular such is a situation when son or daughter take a different line or show different inclination shattering the dreams we built for them maybe from their birth. One doesn't understand that truth and perception can be two different things. However that may hurt us. In particular the felt disregard from the son or daughter.

Thus thinking I remembered when my son graduated with distinction from mathematics. Mathematics was passion for me. I always scored very well in maths be it a school exam or college exam or university exam. I fervently wish that son completes post graduation in mathematics and pursues further studies in mathematics in a reputed university like Cambridge. I told all this to my son, assuring him that all the financial help will be from me for his further studies. The son replied in a somewhat nonchalant tone, at least that appeared so to me. "No, no, I don't wish to take any further studies in mathematics or any other subject. Just as you have passionate love for mathematics; it is the same case about playing guitar for me. I just love playing guitar alone or in a group in a college function or a university function. I already formed a music group of like minded students in the college. I intend to take an ok job (I didn't understand what he meant by an ok job) and vigorously pursue lessons in guitar. My aim is to play guitar in a music group at known clubs, big restaurants and even at some reputed social events. I may also take a six months study tour through a country like Spain to more about the guitar the people there play." With certain disdain in his voice he added that he would not require any financial assistance from me. I tried to convince him that the occasion of playing guitar might not be monetarily handsome and so give him no social status. He sharply replied that he would be financially satisfied. With an outburst he said," What social status I was having to feel proud of?" I was deeply hurt and disappointed; in less that fifteen minutes all my dreams about the son had evaporated. When we both cooled down a bit I suggested to him that let him follow as per his wishes for the next five ears after that he as well as I will view the situation with totally open mind and any assumption. It was five years hence son was finding himself happy with his job and his guitar. He had earned a good name at his skills at guitar. The communication gap between us has however not bridged so far. There was a lurking bitterness between himself and myself till date.

It was a different story now. I had watched for more than an hour the fury and wrath of the nature and its caring kindness. The nature doesn't keep any bitterness towards the erring human beings. What was I being doing all along. The son did not follow my way of thinking. There were angry and bitter words and communication gap. I had clearly conveyed to my son my feelings and my views. Thereafter there should not have been any bitterness, anger and disappointments lurking behind disturbing the free and loving communication between father and son. No, no, this has been all wrong on my part. I must take the lesson from the mother nature. Storms may be there even occasionally in the situation arising from the different line of thinking. In no way there must be any bitterness or ill feelings after the storm had quitened.

With this enlightened approach I was free of any tension, or fear or bitterness. With the eagerness of a child returning from school I rang the doorbell of my house.

***- Sudhakar Chandurkar, Bandra (E) Mumbai***

# STATE BANK OF INDIA
## RETIRED EMPLOYEES' MEDICAL BENEFIT TRUST
## CLAIM FOR REIMBURSEMENT OF DOMICILIARY TREATMENT

| | | |
|---|---|---|
| 01 | Name of the employee (member pensioner) | |
| 02 | Date of Retirement<br>Membership Number | |
| 03 | Whether claimed for self/spouse | |
| 04 | Address & Telephone No. | |
| 05 | Retired As | |
| 06 | Pension Paying Branch SB A/C No. | |
| 07 | Nature of illness | |
| 08 | Name of the dependent family member for whom the Medical Expenses made<br>Name -<br>Age -<br>Relationship - | |
| 09 | Duration of illness | |
| 10 | Name & address of the attending Physician | |
| 11 | Details of expenditure incurred & claim to be submitted alongwith Doctor's prescription—as per reverse | Total Amount |
| 12 | I certify that I have incurred above expenses for myself & / eligible family members | |

Signature of the pensioner member
Forwarded for payment

Branch Manager
Branch _______________

(P.T.O.)

## DETAILS OF THE BILLS

Page - 2

| BILLNO. | DATE | PARTICULARS OF THE BILL | AMOUNT | |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| **TOTAL** | | | | |

Signature of the pensioner member

AT ADMINISTRATIVE OFFICE

Amount of the expenditure claimed for Domiciliary treatment Rs.

Amount of expenditure for Domiciliary treatment already claimed during the year Rs.

Balance available for domiciliary treatment Rs.

Sanctioned Rs. Towards Domiciliary treatment

Chief Manager (HR) Assistant General Manager (ADMIN)

# एका लग्नाची गोष्ट

माझ्या लहानपणीची घडलेली सत्यकथा. एखादा चित्रपट डोळ्यांपुढून सरकावा तसा तो प्रसंग मला चांगला आठवतो.

आम्ही मुंबईत ठाकूरद्वारला एका तीन मजली चाळीत राहत होतो. चाळीत १० ते १२ कुटूंबे होती. आम्ही चाळकरी अत्यंत गुण्या गोविंदाने जसे सर्व एकमेकांचे नातेवाईक असावे अशा पद्धतीने राहत होतो. कुणाचीच दारं रात्रीशिवाय बंद होत नसत. कुणीही कुणाच्याही घरी जावं आणि पाहिजे ते हक्काने मागावं. गणपती, संक्रांत, दिवाळी, कोजागिरी अशा निमित्ताने आम्ही एकत्र येत असू. सर्वांकडे शुभ कार्यात वा आजारपण, दु:खद घटना असल्यास एकमेकांना मदत करीत असू. पण एक लग्न माझ्या कायम लक्षात राहिलं.

त्या दिवशी कसलीतरी सुट्टी होती. सर्व शाळकरी मुले व रोज कामावर जाणारी मंडळी घरीच होती. कुणीतरी बातमी आणली बंड्या काळे कडे आज लग्न आहे! अगोदर मला ही कुणीतरी उगाच गम्मत करीत आहे असे वाटलं. कारण चाळीत लग्नाची मुले मुली नव्हती. पण काळे मावशींच्या घरी गर्दी जमू लागली. लगबग दिसू लागली मग खुलासा झाला की लग्न हे काळे मावशींच्या एका लांबच्या नात्यानं भाची असलेल्या अलका नावाच्या मुलीचे आहे. अलकाची घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची होती. ती बी.ए. झालेली होती. राजेंद्र नावाच्या एका चांगल्या परिस्थितीतील मुलावर तिचे प्रेम होते. मुलगा इंजिनियर होता. पण मुलाकडच्यांचा ह्या लग्नाला तीव्र विरोध होता. तिने काळे मावशींना सर्व कल्पना दिली होती. मावशींनी पण तिला धीर दिला व काही काळजी करू नको मी तुझे लग्न माझ्या घरी अगदी रीतसर लावून देते असे आश्वासन दिले. लग्नाचा दिवस हा आजचा ठरला होता. त्याप्रमाणे सर्व तयारी सुरू होती. चाळीतील सर्वजण कामाला लागली होती. सनई-चौघडेवाले आले होते. दरवाजाला तोरणे लावली गेली. हार-तुरे, पेढे, लग्नाचे साहित्य तयार होते. भटजी हजर होते. फक्त वधू-वर येण्याची लोक वाट पाहत होते.

इतक्यात खाली गल्लीत आरडा-ओरडा झाला. दोन दिवस अगोदर पासूनच मुलाकडचे लोक गुपचूप टेहळणी करीत होते. काळेमावशींच्या घरावर पाळत ठेवून होते. मावशींच्या दीराने जवळच्या पोलीस स्टेशनवर ह्या प्रकाराची पूर्व कल्पना देवून ठेवली होती. ५-६ पोलीस कोपऱ्यावर थांबलेले होते. शिवाय चाळीतील तरुण मंडळीही मदतीला वा येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्यासाठी तयारच होती. हे सर्व बघून काहीतरी भानगड आहे म्हणून येणारे-जाणारे कुतूहलाने चाळीकडे बघत होते.

एवढ्यात एक टॅक्सी आली. टॅक्सीतून वधूवेषात अलका व सोबत काळे मावशींचा दीर, त्याची बायको चाळीच्या दाराशी उतरली. त्यांना मुलाकडच्यांनी शिव्या देण्यास सुरुवात केली. पोलिसांनी त्यांना दंडूके दाखवून बाजूला केले. चाळीतील तरुण मंडळींनी आलेल्या तिघांना सुरक्षित असे कडे करून काळे मावशींकडे रवाना केले. अलका वधू वेषात खूपच छान दिसत होती. सडपातळ, नीमगोरी पण बोलक्या डोळ्यांची आकर्षक व्यक्तिमत्त्वाची कुणीही प्रेमात पडावं अशी. राजेंद्र तिच्या शेजारीच राहत होता. तिला अभ्यासात मदत करायचा. दोन्ही कुटूंबाचे संबंध चांगलेच होते. पण आपल्या इंजिनियर मुलाला श्रीमंत घरची मुलगी सहज मिळेल असे त्याच्या पालकांना वाटत असल्याने व राजेंद्र याने करीन तर ह्याच मुलीशी लग्न करीन असा हट्ट धरल्याने हा प्रसंग उद्भवला होता.

आजच लग्नाच्या दिवशी राजेंद्रचा एका मोठ्या कंपनीत नोकरीसाठी इंटरव्ह्यू होता. इंटरव्ह्यू ११ वाजता होता व तो संपताच तासाभराने राजेंद्र लग्नाला हजर होणार होता. इंटरव्ह्यू संपताच राजेंद्र तसे कळवणार होता, त्या काही घरोघरी टेलिफोन वा हातोहाती मोबाईल नव्हता. समोरच्या चाळीत एका गुजराथी व्यापाऱ्याकडे टेलिफोन होता. तेथे चाळीतील दोन मुले अगोदरच जावून फोन येण्याची वाट बघत बसले होते. राजेंद्रचा इंटरव्ह्यू संपला व तो टॅक्सीने निघाला असा फोन येताच ती दोघं मुलं तेथूनच गॅलरीतून ओरडली. ''निघाला, निघाला! लवकरच पोहचत आहे.'' कोणतीही टॅक्सी हळू येताना दिसली की मुलाकडची माणसं आत डोकावत होती. शेवटी एकदाची एक टॅक्सी वाडीत आली व थांबली, त्यातून राजेंद्र खाली उतरताच त्याच्या वडीलांनी व भावांनी त्याला धक्काबुक्की सुरू केली. पण चाळीतील मंडळी व तरूण पोरांनी त्याला चहूबाजूंनी कडे करून लगीनघरी सुखरूप आणले, त्याच्या नातेवाईकांना चाळीकडे थोडेही सरकू दिले नाही. त्याला आणित असताना कुणीतरी 'गणपती बाप्पा मोरया' अशी आरोळीही ठोकली. येथील चाळकऱ्यांसमोर व पोलिस हजर असताना आपली डाळ शिजणार नाही हे लक्षात घेवून राजेंद्र कडील मंडळींनी काढता पाय घेतला.

काळे मावशींच्या घरात आणि वाडीत शुभमंगल सावधान! म्हणून एकच गलका झाला. मावशींनी व त्यांच्या यजमानांनी अलकाचे यथासांग कन्यादान केले. दोघांना सर्वांनी शुभ-आशीर्वाद दिले. तेवढ्यात पुन्हा फोनवरून निरोप आला की राजेंद्र इंटरव्ह्यूत पास झाला. कारण सर्व इंटरव्ह्यू संपल्यसानंतर ती कंपनी लगेचच सिलेक्शन झाल्याचे कळवणार होती. आनंदात आणखीनच भर पडली. लग्नाची जेवणावळ घालणं शक्य नव्हते म्हणून काळे मावशींनी सर्व उपस्थितांचे पेढे वाटून तोंड गोड केले. सर्व चाळकऱ्यांच्या चेहऱ्यावर आनंद नुसता ओसंडून वाहत होता. कुठले कोण ते दोघं. प्रीतीच्या धाग्यांनी एकत्र आले. कुणीच त्या दोघांना अगोदर बघितलेही नव्हते आणि आज अचानक सर्वांनी मिळून त्यांचे मिलन घडवून आणले. ह्या गोष्टीला अनेक वर्षे झाली. पण आजही चाळीमधले कुणी बाहेर भेटले तर ही आठवण हमखास येते. चाळ सोडूनही आता बरीच वर्षे झाली.

- **इना तळपदे**, बंगलोर
भ्रमणध्वनी - ९८८०८७५८४३

# नमस्कार

नवीन कार्याची सुरुवात आपण 'श्री गणेशाय नम:' हे शब्द उच्चारून अथवा लिहून भरीत असतो. त्याचा अर्थ श्री गजाननाला वंदन, नमस्कार असाच आहे. भारतीयांच्या हिंदू संस्कृतीत अभिवादन करण्याची एक पद्धत आहे. त्या पद्धतीत आदरपूर्वक नमस्कार करतात. नमस्काराच्या विविध पद्धती आहेत. साष्टांग नमस्कार अर्थात शरीराची सर्व आठही अंगे भूमीला टेकवून, पूर्ण झोपून केला जातो. साष्टांग दंडवत असाही नामोच्चार केला जातो. आपण देवासमोर लीन भावाने, भक्तिपूर्वक साष्टांग नमस्कार करतो. देवत्वातील तेजाला हा नमस्कार करावयाचा असतो. त्यामधील शक्तीला तो नमस्कार असतो. बल, ऐश्वर्य, माधुर्य, गंभीरता, उदारता, वात्सल्य आणि सद्‌हृदयता आदि गुणांनी संपन्न असलेल्या देवतांचा आशीर्वाद मिळावा हाच त्यामध्ये भाव असतो. ''कालाय तस्मै नम:।'' कालचक्रालाही नमस्कार केला जातो.

सकाळी झोपेतून उठल्यावर आपण भूमीला वंदन करतो.

'समुद्रवसने देवी पर्वतस्तन मंडले।

विष्णुपत्नी नमस्तुभ्यं पादस्पर्शं क्षमस्व मे।।''

ज्या भूमीवर आपले जीवन अवलंबून आहे, जी आपली माता आहे तिच्यावर पाऊल ठेवताना तिची क्षमा मागून नमस्कार करतो.

सूर्योदयाचे वेळी आपण उगवत्या सूर्याला नमस्कार करून वंदन करीत असतो. त्यावेळी आपण -

मित्र, रवी, सूर्य, भानू, खग, पूषण, हिरण्यगर्भ, मरीची, आदित्य, सवित्र, अर्क, भास्करेभ्यो नमो नम: हा मंत्र म्हणतो. निसर्गाप्रती, चराचर सृष्टीतील प्रत्येकाप्रती आदर दाखवायचा असतो. आदर व कृतज्ञता व्यक्त करण्याची 'नमस्कार' ही एक पद्धत आहे. सूर्य नमस्कार हा एक भारतीय परंपरेतील प्राचीन व्यायाम आहे. शरीर व मनाला योग्य व्यायाम मिळण्याबरोबरच उपयुक्त संस्कारही होत असतात.

नमस्कार हा गुडघे टेकून, डोके टेकून केला जातो. तसेच कोपरापासून मुडपून दोन्ही हाताचे तळवे एकमेकास जोडून शब्दोच्चार करून नमस्कार केला जातो. त्याचप्रमाणे एक हात उंचावूनही अभिवादन केले जाते. हात न जोडता मुखावाटे शब्दोच्चार करूनही नमस्कार केला जातो. आषाढी, कार्तिकी एकादशीसाठी श्री पांडुरंगाच्या दर्शनाला जाणाऱ्या वारकऱ्यांची पावलं पंढरीची वाट चालत असतात. त्या पावलांनाही माऊली म्हणून जिवेभावे वंदन, नमस्कार करण्याची पद्धत आहे.

नमस्कारम्, नमस्ते, वणक्कम्, सत्‌श्री अकाल, सलाम आलेकूम हेही शब्द विविध भाषांमधून अभिवादनासाठी योजलेले आहेत. नातेवाईकांशी पत्रव्यवहार करताना त्यांचे नाव लिहून अभिवादनासाठी व आदर दर्शविण्यासाठी 'स.न.वि.वि.' किंवा सा.न.वि.वि. म्हणजेच 'सप्रेम सस्नेह किंवा सादर, साष्टांग नमस्कार विनंती विशेष' असे लिहून पत्रातील मजकूर लिहिला जातो. या नमस्काराच्या पद्धती एकमेकांप्रती आपुलकी, स्नेहभाव दर्शविणाऱ्या आहेत. 'राम-राम' असा शब्दोच्चार करून नमस्कार करण्याची पद्धत ग्रामीण भागात रूढ आहे. पाश्चात्य देशात हस्तांदोलन करून अभिवादन केले जाते. जपानमध्ये नमस्कार, अभिवादन करण्याची वेगळी पद्धत आहे.

पाहुण्या व्यक्तींचा परिचय करून देताना आणि विविध सभा, संमेलने, कार्यक्रमानिमित्ताने आयोजित प्रसंगी नमस्काराने अभिवादन करून उपस्थितांचे स्वागत केले जाते. देवतांची उपासना करताना 'संध्या' विधी केला जातो. त्या संध्येमध्ये दशदिशांना नमस्कार करावयाचा असतो. नमस्कारासंदर्भात श्री समर्थ रामदासस्वामींची एक उत्कृष्ट काव्यरचना आहे. ते म्हणतात, नवविधा भक्तीमधील 'वंदनभक्ती' सोपी आहे. नमस्कारासाठी काही खर्च करावा लागत नाही. नमस्कारासाठी काही कष्ट पडत नाहीत.

''नमस्कारास वेचावे न लगे। नमस्कारास कष्टावे न लगे।

नमस्कारास काहीच न लगे। उपकर्ण सामग्री।।''

नमस्काराचा हा संस्कार मानवाला मिळालेल्या बुद्धीचा सर्वांप्रती कृतज्ञता व विनम्रता दर्शविण्याचा भाव आहे!

मानाचा मुजरा हाही नमस्काराचा प्रकार आहे. तेव्हा सर्व चराचर सृष्टीला आमचा मानाचा मुजरा अर्थात नमस्कार!

- बी. के. कुलकर्णी, अहमदनगर
फोन - (०२४१) २३२५३०२

## मागणे

देवा नकोस देऊ दीर्घायु या जगात
हा श्वास बंद होवो घटकेत वा क्षणात ।।

दे तू मला पुरेसे धन, मान, प्रेम, माया
आरोग्यदायी राहो माझी सदैव काया
कामात नित्य राहो माझे सदैव हात ।।१।।

आप्तेष्ट मित्र जोवर बोलावतात प्रेमे
हासून स्वागताला येती समीप वेगे
तोडून टाक तोवर नेऊन दूर दूर ।।२।।

गुंतू नये कुठेही हा जीव अंती माझा
जावो तुटून सगळा भवबंध भोवतीचा
आलो जिथून मी हा घेऊन जा तिथे मज ।।

- **आर.जी.कडवेकर,** सातारा
दूरध्वनी - २५१५७६

## आजी-आजोबांचा फोन

हल्ली टेलिफोनला Answering Machine लावले जाते. विशेषत: मोठ्या कंपन्यांमधून चौकशी किंवा तक्रार करण्यासाठी याचा जास्त उपयोग होत असतो. वेगवेगळया तक्रारी व चौकशांसाठी वेगवेगळे १ ते ९ नंबर्स दाबण्यासाठी सूचना मिळत असतात, म्हणजे योग्य त्या विभागात आपली चौकशी व तक्रार पोहचते. त्यातून चौकशी/तक्रार करणाऱ्यांचा वेळ वाचतो असे म्हणतात. पण हल्ली काही लोक घरीसुद्धा आपल्या टेलिफोनला असे Answerring Machine ची सोय करून घेतली. त्यामुळे आपल्या गैरहजेरीत कोणा-कोणाचा फोन येऊन गेला हे बघता येते व Recorded संदेशही मिळतो.

अशाच एका आजोबा-आर्जीनी मुलं/मुली एकाच शहरात पण वेगवेगळे रहात असताना आपल्या व मुलांच्या सोयीसाठी अशा Answering Machine ची सोय करून घेतली त्यांची विषयानुसार वर्गवारी मोठी मजेशीर होती. त्यांना फोन लावला व तो लगेच उचलला गेला नाही तर तो बोलू लागायचा.

''नमस्कार, गुड मॉर्निंग, ह्या क्षणी आम्ही बाहेर आहोत आपण आपले नाव व संदेश, दोन वेळा बीप् बीप् ऐकल्यावर नोंदून ठेवावा.

आपण आमच्या मुला/मुलींपैकी असाल तर १ नंबर दाबा व नंतर २ ते ९ नंबर पैकी योग्य तो नंबर दाबून आपला संदेश ठेवावा, आम्ही घरी परत आल्यावर त्यासंबंधी विचार करून व आपल्याशी संपर्क साधू.

तुम्हाला जर आज आम्ही नातवंडांना सांभाळावे असे वाटत असेल तर २ नंबर दाबा.

* तुम्हाला आज आमची कार हवी असेल तर ३ नंबर दाबा.

* तुमचे कपडे वॉशिंग मशिनमध्ये टाकून त्यांना इस्त्री करून ठेवायची असेल तर ४ नंबर दाबा.

* नातवंडं आज रात्री आमचेकडे झोपण्यासाठी पाठवायची असतील तर ५ नंबर दाबा.

* नातवंडांना आज/उद्या शाळेतून घरी आणावयाचे असल्यास ६ नंबर दाबा.

* जर आपणास येत्या रविवारी आमचेकडे जेवणासाठी यावयाचे असल्यास ७ नंबर दाबा.

* रविवारी आपणास जेवणाचे डबे हवे असल्यास ८ नंबर दाबा.

* आपणास पैसे हवे असल्यास ९ नंबर दाबा.

आपण जर आम्हा दोघांना जेवावयास घरी वा हॉटेलात नेणार असल्यास किंवा नाटक-सिनेमाला नेणार वा कुठे पिकनिकला नेणार असलात तर.... बोला आम्ही फोनवरच आहोत.

- वसंत धुपकर, पुणे

## काहीच जमेना

(चाल : पसायदान)

वाटते काही करावे
कुठेतरी पारांगत व्हावे
सहजी काही जमेना
काय करावे समजेना ।।१।।

लिहितो म्हणून लेखक
परी मिळेना वाचक
वाटले तर वाचावे
नाहीतर फेका रद्दीत ।।२।।

रद्दीला मागणी आहे
भावही तसा बरा आहे
उरले ते भंगार आहे
वाचकांची कमी आहे ।।३।।

संगीताची हौस भारी
कळेनाही गाणे तरी
ताल-सुरांशी जुळेना जरी
समजतो मी तानसेन ।।४।।

नटसम्राट होण्याची इच्छा
अभिनये पुरविला पिच्छा
असावी तशीच ईश्वरेच्छा
म्हणून मी देवदास ।।५।।

नेतेपणाचा अती पीळ
संभाषणात नाही ताळमेळ
विरोधक घालती घोळ
पुढारीपणही जमेना ।।६।।

चार चौघात मिसळणे नाही
वाक्चातुर्यही नाही
जनतेशी संपर्क नाही
परिणामी-काहीच जमेना
काहीच जमेना ।।७।।

**- प्रभाकर कानिटकर**

फोन : ९८८११९९१९९

# ट्रिपला जाताना धाडस जरूर न्यावे!

पूर्वी मामाच्या गावाला सुट्टीत जाणे एवढीच ट्रीप किंवा सहल शब्दाची व्याख्या होती. आता तसे राहिले नाही. सुट्टीत परदेशी किंवा सामान्य कुटुंब परराज्यातील प्रेक्षणीय धार्मिक स्थळांना तरी जातातच. पण १०/१२ दिवसांची टूर असल्याने कितीही जमवाजमव केली तरी 'हे राहिले ते राहिले' होतेच. काही राहूनही गेले तरी चालेल, पण टूरवर जाताना 'धाडस' अडचणी आल्याच तर त्यांना सामोरे जाण्याची 'मनाची तयारी' जरूर न्यावी. अशाने थोड्या थोड्या कारणाने मन नाराज होऊन ट्रीपची मजा न जाता सहल एंजॉय करता येते. याचा उपयोग आम्हालाही झाला.

खूप दिवसांची 'ओंकारेश्वरा'ला जाण्याची इच्छा पूर्ण होतेय. यामुळे सर्वजण आनंदात होते. प्लॅनिंगप्रमाणे आम्ही तेथे पोहोचलो. ओंकारेश्वराचे दर्शन घेतल्यावर सभोवारचा प्रेक्षणीय परिसर पाहून नदीतून बोटीने प्रदक्षिणा घालण्याचे ठरले. एक नावाड्या पाहून आमचे कुटूंब त्या प्रदक्षिणेला निघाले. मध्यावर गेल्यावर नावाड्याचे लक्ष नसल्याने, अचानक नाव मध्यभागी असलेल्या छोट्या खडकावर आदळली आणि अडकली. अगदी पिक्चरमध्ये दाखवतात तशी! बरे अडकली ती तिरपी होऊन! नावाडी ती काढायची खटपट करत होता. परंतु पाणी जास्त असल्याने अधिक तिरकीच होऊन ती जास्त अडकत चालली होती. त्या झटापटीत नाव खडकावर आपटल्याने खालून छोटी चिर पडली आणि पाणी आत शिरायला लागले. सर्वांना आम्ही धीर देत होतो. तो मात्र आता सुटायला लागला कारण एकालाही पोहता येत नव्हते. आईने ओंकारेश्वराचा धावा सुरू केला, बायकोने नावाड्याच्या नावाने बोंबाबोंब सुरू केली. मुलांनी आरडाओरडा सुरू केला. मी एक छोटा प्लॅस्टिक जग हाताला लागला होता त्याने पाणी उपसायला सुरुवात केली. अशाने ती छोटी नाव हिंदळायला लागली. त्यामुळे ती उलटी होऊ नये म्हणून नावाड्याने तसे करण्यास मनाई केली. काही सूचत नव्हते. सभोवताली फक्त पाणी व त्याचा राहणारा आवाज होता. दिसणारी तटं लांब असल्याने त्यांच्यापर्यंत आवाज जात नव्हता. त्यात दुर्दैव म्हणजे गेल्या ताराभरात तिकडून एकही दुसरी नाव जाताना येताना दिसत नव्हती. मी धैर्य एकवटले व धाडसाने नाव जाम अडकलेल्या त्या छोट्या खडकावर तोल सावरत उतरलो व उभा राहिलो. जवळ मुलीच्या अंगावरचा लाल दुपट्टा हातात घेतला, लांब एक घाटाचा तट दिसत होता. तिथे एक नाव उभी होती, त्या दिशेने लाल दुपट्टा फडकवू लागलो, तोंडाने आरोळ्याही देत होतो. त्या तटाकडच्या नावाड्याचे एकदा माझ्याकडे लक्ष गेले, मी लगेच हाताने नाव घेऊन येण्यास खूण केली. प्रसंग त्याच्या लक्षात आला असावा. त्याने दोर, टायर घेऊन नाव आमच्यापर्यंत आणली. त्या खडकाला वळसा घालून थोड्या अंतरावर उभी केली आणि एकेकाला तोल सावरत, टायरचा दोर हातात देऊन त्याच्या नावेत घेतले व ओंकारेश्वर मंदिराला नेऊन सोडले. आमची नाव तिथेच सोडावी लागली. कारण ती निघणे शक्य नव्हते. आम्ही परत ओंकारेश्वराचे दर्शन घेतले. अडचणी येऊ शकतात. आपण त्यातून निभावलो ना, ही समजूत करीत तो प्रसंग तेथेच विसरायचे ठरवून त्या नदीला अर्पण केला आणि पुढच्या प्रवासाला आनंदाने निघालो. मुलांनी 'व्हिडिओ कॅमेरा असता तर तो प्रसंग शूट केला असता' वगैरे जोक्स करून पुढच्या सहलीचा आनंद घेतला. धैर्य आणि पेशन्स कामाला आले.

**- भरत जैन,** नाशिक

भ्रमणध्वनी - ९५०३०५७९९७

## कवितेचा जन्म

जेव्हा प्रतिभा कल्पनेत साकारते
अन् कल्पना शब्दरूप घेऊ लागते
शब्द मोती ओघळू लागता
होतो जन्म कवितेचा
एका मागून शब्द एक स्फुरत
ओळींची माळ ओवू लागता
कल्पना विलास कविचा
हमखास येई बहरास
मनाच्या गाभाऱ्यातून भावनारूपी
ओसंडून वाहू लागतो
शब्दांचा प्रवाही झरा
तेव्हा कल्पना येती आकारा
कविता तरली मनाचे स्पंदन
कविता वेदनेची संवेदना
कविता वाळवंटातली हिरवळ
कविता भाव फुलांची ओंजळ
कविता कविमनांचे मनोगत
कविता मूक मनाचे रूदन
कविता भावनांचा अविष्कार
कविता गूढ मनाचा साक्षात्कार

**- सुरेखा सिरसीकर,** औरंगाबाद

## आदर्श भ्रष्टाचाराचा
## ऱ्हास मानवी जीवनाचा

अरे आन्या पैश्याच्या लोभानं
गुणाची माती करता
मातीतून जल्मले पण मातीलेही लाज आनता!
माती लाखोचा भार वाहते
तुम्ही लाखोले भार होता!
कुणाशी तरी इमान राखावे
स्वत:शीही कसे बेईमान होता रे!
मानसाची बुद्धी फसवते तवा हसवते
पण सोताच फसली का खवळते
अरे करशीन तसा भरशीन
सोतालेच फसवून सुखी कसा होशीन!

महाकारूनी तथागत गौतम बुद्धांनी जगाला ज्ञानाचा दीप दिला. अंधाराकडून प्रकाशाकडे जाणारा मार्ग दाखविला. मानवाला दु:खापासून विमुक्तीचा मार्ग दाखविला.

संत कबिरांनी संत तुकाराम, डॉ. बाबासाहेब यांनी त्याच मार्गाने आपले 'जीवन' मंगलमय निर्मळ कसे ठेवावे व सदाचाराने परोपकाराने आदर्शवत कसे राहील असे सांगितले. स्वत: आदर्शमय जीवनाची यशोगाथा रचली.

त्यांचा काळ हा 'सुवर्णयुग' काळ होता, या काळात आदर्शवत समाज निर्माण झाला.

आज 'इकविसाव्या' शतकात त्या आदर्शवादी समाजाचे थोडेतरी अवशेष आपल्या मनात आहेत का? कि नवीन येणारी भावी पिढी सुद्धा आपणच निर्माण केलेल्या 'सैतानी' प्रवृत्तीच्या आचार-विचारांवर उभी राहणार !

कुठेतरी मनाच्या कोपऱ्यात मायेचा ओलावा असू द्या ही संपत्ती आपली नाही हे अगोदर मनाने ठरवा.

'हा देश' ह्या देशातील संपत्तीचा मालक आहे. मी 'म्हणजे देशातील प्रत्येक नागरिक' केवळ त्याचा रक्षणकर्ता आहे. सर्व निसर्गदत्त साधनसंपत्ती ही देशाची मालमत्ता आहे. त्यावर कुणाचीही 'खाजगी' सत्ता नाही. ह्या साधन संपत्तीचा चांगल्या मार्गाने समाजाला त्याचा उपयोग कसा होईल याकडे लक्ष देईन. आज सगळीकडे देशाच्या मालमत्तेची लयलूट चालली आहे. लोकप्रतिनिधी, की सरकारी अधिकारी सुद्धा या लूटमारीत सामील होत आहेत. या देश पातळीवर चाललेल्या लुटीत निगरगट्टपणे साथ देत आहेत.

ज्यांचा आज 'आदर्श' म्हणून 'समाजसेवक' साधू, मंत्री, महंत इत्यादींना समाज उभा करतो ते सुद्धा प्रतिष्ठित एक 'बुजगावणे'च आहेत का? हे प्रतिष्ठित लोक 'भारतीय राज्य घटने' प्रमाणे का वाटचाल करीत नाहीत? का म्हणून घटनेच्या प्रत्येक कलमाच्या अंगिकार, आग्रह करीत नाहीत?

मी या देशाच्या संपत्तीचा चांगल्या मार्गाने देशातील नागरिकांना (समाजाला) कसा उपयोग होईल याकडे लक्ष देईन हे मन:पूर्वक मनाच्या आरशावर परावर्तित करावे लागेल तरच 'आदर्शवत' समाज निर्मिती होईल. 'अन्यथा ऱ्हास मानवी जीवनाचा'

**- वाल्मिक कापडे,**
मालेगाव (नासिक)

DO YOU KNOW WHERE OUR CURRENCY COINS ARE MADE?

INDIAN CURRENCY COINS ARE MADE IN FOUR MINTS - NAMELY DELHI. MUMBAI, HYDERABAD AND KOLKATA. EACH MINT HAS A DIFFERENT SYMBOL, AND THESE ARE INDICATED JUST BELOW THE YEAR OF MAKE, AND FROM THAT WE CAN KNOW IN WHICH MINT THE COIN IS MADE.

SYMBOLS OF EACH MINT ARE AS UNDER-

| NAME OF MINT | SYMBOL |
|---|---|
| DELHI | DOT |
| MUMBAI | DIAMOND |
| HYDERABAD | STAR |
| KOLKATA | THERE IS NO SYMBOL |

THIS HELPS US TO IDENTIFY THE MINT IN WHICH COINS ARE MADE.

**- N. K. FARAMJI** (Vile Parle)
(022) 26715964

# घोटाळा

आजकाल ‘घोटाळा’ हा शब्द अत्यंत प्रचलित झाला आहे. जिकडे तिकडे घोटाळ्याचे साम्राज्य पसरले आहे. घोटाळ्याविना आज आमचा दिवस उजाडतच नाही आणि रात्रही सरत नाही.

पूर्वीच्या काळी घोटाळा हा शब्द कधीतरी चुकूनमाकून कानी पडे. परंतु हल्ली घोटाळा हा शब्द रोज ऐकून कानठळ्या बसतात. आपल्या पूर्वजांना, आपल्या वाडवडीलांना घोटाळ्याचे वावडे होते. पण सध्याच्या पिढीला घोटाळ्याच्या फावड्याशिवाय बिलकूल जमत नाही.

घोटाळ्याची नक्की ‘व्याख्या’ काय? घोटाळा कशास म्हणावयाचे? आपला ज्यावर अधिकार नाही अशा रकमेचा स्वत:च्या फायद्यासाठी केलेला सोयीस्कर अपहार किंवा आपल्या पदाचा दुरूपयोग करून साधलेला स्वत:चा स्वार्थ किंवा कायद्यास वेठीस धरून, लबाडी करून, केलेला स्वत:चा आर्थिक फायदा म्हणजेच घोटाळा!

घोटाळा कोणी करावा? कसा करावा? याला काहीही धरबंद नाही. आजकाल कोणीही ऊठसूट घोटाळा करू शकतो. बँकेतला बाबू घोटाळा करू शकतो, व्यापारी घोटाळा करू शकतो, दुकानातील मुनीम घोटाळा करू शकतो, सरकारी कार्यालयातील साधा शिपाईही महान घोटाळा करू शकतो. ज्याच्या मनात आले तो घोटाळा करू शकतो.

घोटाळा किती करावा याला काहीही ‘सिलींग’ नाही, मर्यादा नाही. घोटाळ्याचे कोणतेही मोजमाप नाही. आपापल्या कुवतीनुसार जेवढा पाहिजे तेवढा घोटाळा कोणीही, केव्हाही खुशाल करू शकतो. कारण घोटाळा करण्यासाठी कोणतेच ‘क्वालिफिकेशन’ लागत नाही. घोटाळा कसा करावा हे शिकविणारे विद्यापीठ कोठेही नाही, पण विद्यापीठात मात्र सर्वत्र घोटाळा आढळतो. घोटाळ्याची ‘पदवी’ कोठेही मिळत नाही पण ‘पदवीदान’ समारंभात मात्र घोटाळा हमखास दडलेला असतो.

आपल्यासारख्या सामान्य माणसांचे दैनंदिन आयुष्यसुद्धा घोटाळ्यांनी व्यापलेले असते. परवा दोडक्याच्या भाजीत मीठ जास्त झाले होते. मी पत्नीला म्हणालो, ‘‘अगं भाजीत मीठ जास्त झाले आहे.’’ ती म्हणाली, ‘‘हो, ना घोटाळा झाला, मी चुकून भाजीत दोनदा मीठ घातले.’’ काल मी किराणा सामान आणण्यासाठी वाण्याच्या दुकानावर गेलो होतो. घरी येऊन पाहतो तर काय, माझ्या गाडीच्या डिकीत किराण्याची पिशवीच नव्हती. मी ओरडलो, ‘‘अगं, काहीतरी घोटाळा झालाय, चुकून पिशवी वाण्याच्या दुकानातच राहिली वाटतं.’’ सामान्य माणसांचे घोटाळे हे असे सामान्य असले तरी आपण सामान्य माणसेसुद्धा घोटाळ्याशिवाय राहू शकत नाही मग राजकारणी माणसे कशी राहू शकतील? आपण सामान्य माणसे राजकारण्यांच्या घोटाळ्याबद्दल उगीच ओरड करीत असतो. तो तर त्यांचा जन्मसिद्ध हक्कच आहे ना?

‘आदर्श’ घोटाळा, २ जी स्पेक्ट्रम घोटाळा, राष्ट्रकुल घोटाळा, ‘जमीन’ घोटाळा, शस्त्रास्त्र खरेदीतील घोटाळा, अन्नधान्य आयातीमधील घोटाळा, अशी घोटाळ्यांची मालिकाच राजकारण्यांनी मुक्त हस्तांनी या देशाला बहाल केली आहे. माणसांचे अन्नधान्य घोटाळ्यासाठी अपुरे पडते म्हणूनच की काय, जनावरांचा चाराही हे राजकारणी लोक खुशाल गिळंकृत करतात आणि ‘चारा घोटाळ्या’सारखा अमूल्य ठेवा देशाला बहाल करतात. एकवेळेस दिवसभर घोटभर पाणी मिळाले नाही तरी चालेल, पण पोटभर घोटाळा केल्याशिवाय राजकारण्यांचे चालूच शकत नाही. खरेच, राजकारणी लोकांचे हे उपकार कसे फेडता येतील?

अशा रीतीने सध्या घोटाळ्याने समस्त मानवी जीवनच व्यापून टाकले आहे. ‘घोटाळा’ हा जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे. ‘दारुबाज’, ‘दगाबाज’ इत्यादी शब्दाप्रमाणेच ‘घोटाळेबाज’ हा नवीन शब्द हल्ली मराठी भाषेत रुढ होऊ लागला आहे. कारण ‘घोटाळा’ हा आता सर्वव्यापी शब्द झाला आहे, सर्वसमावेशक शब्द झाला आहे.

– **रमेश जिनदास बेलोकर**, नांदेड

भ्रमणध्वनी – ९४२१८४०७४५

मध्यमवर्गीयांसाठी डिलक्स, इकॉनॉमी सहली

राजगुरु टुर्स

जिव्हाळा जपणारी माणसं...

| | बजेट | डिलक्स |
|---|---|---|
| केरळ-कन्याकुमारी | 12,475/- | 16,975/- |
| राजस्थान | 12,475/- | 14,975/- |
| हैद्राबाद-रामोजी-श्रीशैल्य | 9,975/- | 11,975/- |
| सोमनाथ-द्वारका-गिरनार | 7,975/- | 9,475/- |
| पुरी-भुवनेश्वर-कोणार्क | - | 9,975/- |
| अमृतसर-काश्मिर-वैष्णोदेवी | - | 15,475/- |
| दार्जिलींग-सिक्किम-गंगटोक | - | 17,475/- |
| स्पेशल मध्यप्रदेश | - | 19,975/- |
| नैनीताल-राणीखेत-कॉर्बेट | 12,975/- | 14,975/- |

• महिला स्पेशल • ज्येष्ठ नागरीक विशेष • हनीमून टुर्स

स्टेट बँक स्टाफ व पेन्शनर्सना ₹ 500/- ते 1000/- प्रत्येकी सवलत

२७ सप्टेंबर पर्यटन दिनानिमित्त फोटोग्राफी स्पर्धा

मुंबई : 022 - 24318082 / 24381026

संपर्क : राजन पाडलोसकर - 9322231216

www.rajgurutours.com

## आत्म-बोध

अटळ नियतीचे खेळ चालती, जगी या सर्वत्र
मी मानत नाही भय मृत्यूचे, तो तर माझा मित्र !

कळ्या उमलती, फुलती आणि आनंदा उधळती
सुकल्यावरही परिमळरूपे, चिरंजीव होती
बोध घेऊ या समर्पणाचा, उघडून आंतर्नेत्र
'देणाऱ्याचे हात घ्यावया' पुढती विशाल क्षेत्र ! ॥१॥

तारे मिटती, सूर्य मावळे, पुन्हा उगवण्यासाठी
सरिता-सागर आटती-घटती पुन्हा बरसण्यासाठी
कर्तृत्वाचा नको चौघडा, आपण निमित्त-मात्र
रहस्य जाणा कालगतीचे, दिवसामागून रात्र ! ॥२॥

वेद सांगती नश्वर काया, आत्मा अविनाशी
जे जे उपजे, ते ते नाशे, ज्ञानेश्वरीच्या भाषी
कार्य संपता सृष्टीचे या, उघडेल शिवाचा नेत्र
राहिल तोवर फिरत निरंतर, जन्म-मृत्यूचे चक्र ! ॥३॥

जीवन फुलते मरणामधुनि, हा नवसृजनाचा मंत्र
करणे-मरणे-करित राहणे, माझे जीवनसूत्र !

**- गोविंद करमरकर, सांगली**
**दूरध्वनी - ०२३३-२३२०९११**

## अभिनंदनीय

आपले वर्धा येथील सभासद श्री. शंकर या. काणणव यांचा नातू कु. हर्षवर्धन याने मार्च २०११ मध्ये झालेल्या १०वी च्या परीक्षेत ९५.४५ टक्के गुण मिळवून विशेष प्रावीण्य संपादन केले.

कु. हर्षवर्धन याने प्राप्त केलेल्या या सुयशाबद्दल त्याचे असोसिएशनतर्फे हार्दिक अभिनंदन आणि भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा!

**- सेक्रेटरी**

## सवत

माझी सवत मला हवीहवीशी वाटणारी
सुख-दु:खात मला साथ देणारी (दचकलात ना?)

आधी मी तिच्यावर खूप चिडायची
नको नको ती दूषणे लावायची
ती किंवा मी असं सुद्धा म्हणायची
पण माझं सगळं म्हणणं खोटं ठरवणारी... माझी सवत

असं आश्चर्यानं 'आ' वासू नका
डोळे फाडून असं बघू नका
तोंडात बोटे घालू नका
कारण तिची करामतच न्यारी... माझी सवत

घर बांधताना तिनेच दिला हात
लग्न-कार्यात तिचीच होती साथ
आजारपणातही जोडीनं होती दिनरात
आणि आयुष्याच्या प्रत्येक क्षणी धीर देणारी... माझी सवत

आता आयुष्याच्या उतारावर
स्वस्थ जीवन जगतोय तिच्या भरवश्यावर
निवृत्तीनंतरही आम्हाला पोसणारी
वैद्यकीय सेवा पुरविणारी... माझी सवत

अहो! असे बघताय काय?
ती दुसरी-तिसरी कोणी नाय
आपणा सर्वांचीच ती सखी हाय
'स्टेट बँक ऑफ इंडिया' जणू दुसरी माय॥

**- सौ. उषा प्रभाकर जवखेडकर,**
पुणे, भ्रमणध्वनी - ९७६७६२३५३६

## विनोद

गुरूजी : १५ माणसे ३ दिवसात एका बागेची सफाई करतात तर ३० माणसे त्या बागेची सफाई किती दिवसात करतील?

रमेश : पण गुरूजी एकदा साफ झालेल्या बागेची परत सफाई कशाकरता? उगाच मेहनत.

**- भरत जैन,** नाशिक

Regd. under RNI No. MAHBIL/2008/25425 & Declaration No. PHM/SR/63/VIII/2008 Dated 12/5/2008
SSPO Pune under Postal Concession register No. PNCW/M-144/2011-2013 Dated 10.12.2010
Licence to post at Market Yard P.S.O. on 25th of each Month

## करूणा

कशी गाऊ बाळा मी अंगाई
बंधतुटल्या कंठात सूर जुळतच नाही।

कशी भागवू तुझी दूधाची तहान
ममता उरात परि पान्हा आचळात नाही।

कशी करू आस आता मी कुणावर
फुंकर घालण्या वाली उरला कुणीच नाही।

छळतात सारे अंधार वाटेवर कफल्लक
पावलागणिक शत्रू इथे कुणी मित्र नाही।

पाऊल चालतात खांद्यावर घेऊन अनेक चेहरे
आरश्यात चेहरा माझा दिसत काहीच नाही।

काजळभर डोळ्यात सजविलेली उजेडाची स्वप्ने
पहाटेच्या स्पंदनांचा आवाज कुठे येत नाही।

उरातील आग मनातील पीडा अत्याचार भारी
सोसले बहु कालपावेतो नेहमीच पुढे सोसणार नाही।

**- बी. बी. खोब्रागडे,** नागपूर
(भ्रमणध्वनी - ९८२३११८८२८)

## यौवन

उनाड मोकळ्या केसामधुनी तुझिया
थेंब पावसाचे हळुवार निथळत होते
गोड गुलाबी गालांवरुनी तुझिया
सप्त सूर जणू बरसत होते

तुझ्या चेहऱ्याच्या अवती भवती
काळ्या विषारी बटांची जाळी होती
ओलेत्या तलम वस्त्रामधूनी तुझिया
कोवळी किरणे सूर्याची, जणू झिंगत होती

तुझ्या यौवनाचे वारू तेव्हा
चाफेर चहूकडे जणू उधळले होते
गच्च बांधलेल्या पदराआडूनही
दोन्ही डोळ्यांना, माझ्या सुखावत होते

**- दिलीप अ. रेडकर**
गोरेगाव (प) मुंबई

**सूचना :** १) या मासिकांत प्रसिद्ध झालेल्या लेखांतील मतांशी संपादकमंडळ सहमत असेलच असे नाही. तसेच जाहिरातीतील मजकुराची सत्यासत्यता सभासदांनी स्वत: पडताळून घ्यावी. त्याबाबत असोसिएशन वा 'संवाद' चे संपादक मंडळ जबाबदार असणार नाही. २) असोसिएशनचे कार्यालय, सोमवार ते शुक्रवार, संध्याकाळी ६ ते ७.३० या वेळातच उघडे असते. याची कृपया नोंद घ्यावी. संपर्क दूरध्वनी क्रमांक : (०२०) २४३३२१४१

**Thane Office Address**: A/5 Swami Siddharth CHS Ltd., S V Road, Naupada, Thane 400 602. Tel. No : 25446837
Timings : On Tuesday & Friday between 4 pm to 6 pm.

Printed Matter

***If Undelivered Please Return to :***
**STATE BANK OF INDIA PENSIONERS' ASSOCIATION, (MUMBAI CIRCLE), PUNE**
**Anubandh, Building No. B-2, 4th Floor,**
**Block No.16, Near Ramkrishna Math,**
**Sinhagad Road, Pune 411030. Ph: 24332141**

To,

**Publisher** – Shri. Ramchandra Narayan Lalingkar, Secretary, State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune has printed this magazine in the Printing Press owned by **Printer** – Shri.Chandrashekhar Digambar Joshi, Director, Shree J Printers Pvt.Ltd., at 1416 Sadashiv Peth, Datta Kuti, Pune – 411030 on behalf of **Owner** – State Bank of India Pensioners' Association (Mumbai Circle),Pune, at "Anubandh", Bldg.No.B2, Block No.16,Near Ramkrishna Math, Sinhagad Road, Pune – 411030. **Editor** – Shri. Krantisen Ramchandra Athawale – address as above.